| Publication | Edition | Date | Page No. | Subject |
|---|---|---|---|---|
| Lokmat | Mumbai | 17/05/2019 | 04 | Sunny Pawar wins 'The Best Child Actor' Award |



## सनीने पटकावला सर्वोत्कृष्ट बालकलाकाराचा पुरस्कार!

मुंबईतल्या कलिना भागातील स्लममध्ये राहणाऱ्या ११ वर्षीय सनी पवारने पुन्हा एकदा परदेशात डंका पिटला. सनीने १९व्या न्यू यॉर्क इंडियन फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'सर्वोत्कृष्ट बाल कलाकार'चा ॲवॉर्ड जिंकला आहे.

पान ४

# सनीने पटकावला सर्वोत्कृष्ट बालकलाकाराचा पुरस्कार!



मुंबईतल्या कलिना भागातील स्लममध्ये राहणाऱ्या ११ वर्षीय सनी पवार पुन्हा एकदा परदेशात डंका पिटला. सनीने १९ व्या न्यूयॉर्क इंडियन फिल्म फेस्टिव्हलमध्ये सर्वोत्कृष्ट बाल कलाकारचा ॲवॉर्ड जिंकला आहे. चिप्पा सिनेमातील भूमिकेसाठी त्याला हा पुरस्कार देण्यात आला आहे. सनीने यापूर्वी ऑस्ट्रेलिअन दिग्दर्शक गार्थ डेव्हिस यांच्या २०१६मधील 'लायन' या हॉलिवूडपटात देव पटेलच्या लहानपणीची भूमिका साकारली आहे. हा ॲवॉर्ड जिंकल्यानंतर सनी म्हणाला, 'मला हा पुरस्कार मिळाल्याने मी खूप आनंदी आहे. याचे सारे श्रेय माझ्या आई-वडिलांना जाते. मला रजनीकांत यांच्यासारखा मोठा कलाकार व्हायचं आहे तसेच आई-वडिलांना अभिमान वाटेल अशी कामगिरी मला करायची आहे. मला बॉलिवूड आणि हॉलिवूड दोन्हीकडे काम करायची इच्छा आहे.' चिप्पा ही एका मुलाची हृदयस्पर्शी कथा आहे, ज्याला त्याच्या दहाव्या वाढदिवसाला दीर्घकाळापासून दूर असलेल्या त्याच्या वडिलांचे पत्र मिळते. तो आपले रस्त्यावरील घर सोडून काही आणखी गोष्टींचा शोध घेण्याचे ठरवतो. चित्रपट एका रात्रीमध्ये घडलेल्या घटनांना सादर करतो. यामध्ये चिप्पाने त्याच्या वडिलांशी असलेल्या बंधांचा शोध घेण्यासाठी केलेल्या सुंदर व घटनापूर्ण प्रवासाचा समावेश आहे. सनीसोबत चंदन रॉय सन्याल, मसूद अख्तर, सुमीत ठाकूर आणि माला मुखर्जी यांच्याही या चित्रपटात महत्वाच्या भूमिका आहेत.